जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

## प्रेसनोट क्र. ३०२८, दि.२०/०९/२०१९

## शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर
## रस्ता चुकलेल्या अल्पवयीन मुलीस वडीलांचे ताब्यात दिले.

दि. ११/०९/२०१९ रोजी इसम नामे – अभिषेक शरद इथापे रा. मंगळवार पेठ पुणे. मो नं. ९५०३३१७४७८ यांनी शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे येवुन कळविले की, ते शिवाजी पुलावरून जाताना एक मुलगी रडत होती तिने त्यांना सांगितले की, ती तळेगाव ढमढरे येथे रहात असुन तिने तिचे वडीलांना फोन करण्यासाठी माझेकडे मोबाईल मागितला त्यावेळी मी तिला माझे मोबाईल वरून तिचे वडीलांचा मोबाईल नंबरवर फोन लावुन दिला असता तिने तिचे वडीलांना सांगितले की, ती सकाळी ०७.३० वा. चे सुमारास सायकल घेवुन पीएमटी बस स्टँड तळेगाव ढमढेरे येथे सायकल घेवुन खेळत होती. तिला आजीची आठवण झाली म्हणुन लोहगावला जाण्यासाठी ती पीएमटी बसमध्ये बसली. तेव्हा बसमध्ये एका महिलेने तिचे तिकीट काढले व तिला येरवडा येथे उतरण्याचे ऐवजी तिला काही एक सुचत नसल्याने ती मनपा येथे उतरली. असे सागितलेने सदर इसमाने तिचे वडीलांना तुंम्ही मुलीला घेणेसाठी या तोपर्यंत मी तिला जवळचे शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे घेवुन जात आहे असे सांगितले. त्यानंतर सदर मुलीचे वडील भगवान महादु खुरपे वय–३८ वर्षे,रा. मु.पो. तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर जि.पुणे यांना शिवाजीनगर पोलीस ठाणे कडील मपोना ६०३१ बुटे, मपोशि माने, मपोशि बेंद्रे यांनी संपर्क साधून पोलीस ठाणेस बोलावून घेतले व मुलगी श्रध्दा भगवान खुरपे वय-१२ वर्षे, हिचेकडे चौकशी केली असता तिने सांगितले तिला आजीची आठवण झाल्याने ती पीएमटी बस मधुन लोहगावला येत होती परंतु तिला येरवडा येथे उतरण्याचे न सुचल्याने ती मनपा येथे शेवटच्या बसस्टॉपला उतरली. तेव्हा तिस शिवाजीनगर पोलीस ठाणे कडील कर्मचारी व तिचे वडीलांनी तुला कोणी काही त्रास दिला काय असे विचारले असता तिने तिला कोणीही काही त्रास दिलेला नाही असे सांगितले. सदर मुलीस तिचे वडीलांकडे खात्री करुन ताब्यात दिले आहे त्याबाबत त्यांनी पोलीसांचे आभार मानले आहेत.

तरी सदरबाबत आम्ही वपोनि श्री. बाळासाहेब कोपनर सो यांचे मार्गदर्शन घेवून योग्य ती कारवाई करण्याबाबत आदेश दिल्याने पी.ए. मुत्नाळे पोलीस उपनिरीक्षक मपोना ६०३१ बुटे, मपोशि माने, मपोशि बेंद्रे यांनी चांगली व उत्तम कामगिरी करून सदर मुलीस तिचे वडीलांच्या ताब्यात दिले आहे अशी उत्तम कामगिरी करण्यात आली आहे.